सकाळ

# वानवडीत विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षिततेचे धडे

**हडपसर :** येथील अण्णासाहेब मगर महाविद्यालय आणि क्विक हिल फाउंडेशनतर्फे वानवडीतील विठ्ठलराव शिवरकर विद्यालयात सायबर जनजागृती अभियान राबवण्यात आले. 'सायबर शिक्षण फॉर सायबर सुरक्षा २०२६' उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना ऑनलाइन सुरक्षिततेचे धडे देण्यात आले. यावेळी सायबर वॉरिअर्स काजल लवांडे, पायल इंगोले, श्रावणी जगताप व मिनाज नदाफ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ऑनलाइन फसवणूक टाळणे, मजबूत पासवर्डचे महत्त्व, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, ओटीपी फसवणूक आणि सायबर बुलिंग या विषयांवर त्यांनी प्रकाश टाकला. प्रत्यक्ष उदाहरणे आणि प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून फिशिंग, डिजिटल फूटप्रिंट आणि सायबर गुन्ह्यांपासून संरक्षणाचे उपाय सांगण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य लहू वाघुले यांनी केले. मगर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे, उपप्राचार्य डॉ. प्रशांत मुळे, डॉ. शुभांगी औटी, विभागप्रमुख प्रा. विलास वाणी व प्रा. मनीषा गाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम झाला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब शिवरकर, सचिव चंद्रकांत ससाणे, कविता शिवरकर, अभिजित शिवरकर, सुनील गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

Pune, Pune-Today
05/08/2026 Page No. 5